# महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित

नोंदणीकृत कार्यालय : ''महाबीज भवन'', कृषि नगर, अकोला.

**CIN-U01200MH1976SGC018990**

फोन. नं. (०७२४)-२४५२०६०, २४५५०९३ मो. ८६६९६४२७०४, ८६६९६४२७०६, ७५८८६०७६१२


जा.क्र.मराबिम/कंस/संचालक निवडणुक-२०२६/ दि.०९/०१/२०२६

## संचालक निवडणुक-२०२६

प्रति,

सन्माननिय भागधारक,
महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित,अकोला.

महोदय,

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाच्या कृषक भागधारकांनी संचालक मंडळावर दोन संचालक निवडून द्यावयाचे असतात. सदरहु संचालकांच्या पदासाठी टपाल मतपत्रिकेद्वारे निवडणूक घेणे हया विषयावर संचालक मंडळाच्या दिनांक २९ सप्टेंबर २०२५ रोजी संपन्न झालेल्या २२३ व्या सभेत मान्यता देण्यात आलेली आहे. संचालकांच्या निवडणूकीचे नियम तथा अधिनियम इच्छुकांना नोंदणीकृत कार्यालय, ''महाबीज भवन'', कृषि नगर, अकोला ४४४ १०४ येथे पहावयास उपलब्ध आहेत.

उपरोक्त निवडणुकीकरिता मतदार संघाची रचना खालीलप्रमाणे असून त्यात पुढील मतदान विभागांचा समावेश करण्यात आला आहे.

**१) मतदार संघ १ :-**

**जिल्हे/तालुका**

(तहसील अंतर्गत सर्व कृषक भागधारक)

जिल्हे :- अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम, वर्धा, नागपूर, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली

**२) मतदार संघ २ :-**

**जिल्हे/तालुका**

(तहसील अंतर्गत सर्व कृषक भागधारक)

जिल्हे :- बुलढाणा, परभणी, हिंगोली, लातूर, नांदेड, सोलापूर, धाराशिव, जालना, बीड, छ.संभाजीनगर, अहिल्यानगर, पुणे, जळगांव, धुळे, नाशिक, नंदूरबार, कोल्हापूर, सांगली, सातारा, रायगड, ठाणे, मुंबई.

**<u>संचालकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहिल.</u>**

| अ. क्र. | तपशील | वार | तारीख |
|---|---|---|---|
| १ | निवडणुकीची सुचना पाठविण्याची तारीख | शुक्रवार | ०९/०१/२०२६ पर्यंत |
| | निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्याची तारीख | शुक्रवार | ०९/०१/२०२६ पर्यंत |
| २ | नामांकन पत्र दाखल करण्याची शेवटची तारीख (सार्वजनिक सुटीचे दिवस वगळून) महाबीज भवन अकोला येथे राहील. | सोमवार | ०२/०२/२०२६ दुपारी ३:०० नंतर |
| ३ | नामांकन पत्रांची छानणी | सोमवार | ०२/०२/२०२६ दुपारी ३.०० नंतर |
| ४ | नामांकन पत्र परत घेण्याची अंतीम तारीख | गुरुवार | ०५/०२/२०२६ दुपारी ३:०० पर्यंत |
| | वैध उमेदवारांची अंतीम यादी प्रसिध्द करावयाची तारीख | गुरुवार | ०५/०२/२०२६ दुपारी ४:०० नंतर |
| ५ | मतपत्रिका, ओळख पत्र पाठविण्याची तारीख | शुक्रवार | १३/०२/२०२६ पर्यंत |
| ६ | मतपत्रिका स्विकारण्याची अंतीम तारीख | शुक्रवार | १३/०३/२०२६ संध्याकाळी ६:०० पर्यंत |
| ७ | मतपत्रिकांची छानणी/वैद्य मतपत्रिकांची अंतिम यादी तयार करणे/इतर. (सुट्टीचे दिवस सोडून) | सोमवार ते बुधवार | १६/०३/२०२६ ते २५/०३/२०२६ सकाळी ११:०० ते ६:०० |
| ८ | मतमोजणी व निकाल जाहीर करणे. | शुक्रवार | २७/०३/२०२६ (२८/०३/२०२६ राखीव दिवस) |

निवडणुकीत सहभाग नोंदविलेल्या उमेदवारांची यादी महामंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. या व्यतिरिक्त, निवडणूकीचा कार्यक्रम नोंदणीकृत कार्यालय, अकोला तसेच सर्व महाबीज विभागीय कार्यालय येथे सूचना फलकावर लावण्यात येईल.

**<u>मतदारांची यादी :-</u>**

संचालकांच्या निवडणुकीत असे सर्व कृषक भागधारक ज्यांची नांवे दिनांक ३१/०१/२०२६ रोजी भागधारकांचे रजिष्टरमध्ये नोंदलेली आहेत त्यांनाच उमेदवारी तथा मतदानाचा अधिकार राहिल. प्रत्येक कृषक भागधारकास त्यांनी धारण केलेल्या एकूण समभागांच्या संख्ये एवढया मताचा अधिकार राहील. मतदारांची यादी व प्रत्येक मतदारास हक्क असलेल्या मतांची संख्या महामंडळाच्या नोंदणीकृत कार्यालय 'महाबीज भवन' कृषि नगर, अकोला तसेच शिवणी-अकोला, परभणी, नागपूर, जळगांव पुणे व जालना येथील विभागीय कार्यालय तसेच जिल्हा कार्यालयात दिनांक ०९/०१/२०२६ ते ३१/०१/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळात (सुटीचे दिवस वगळून) पाहण्यासाठी उपलब्ध राहील. भागधारकांना यादीतील नोंदीसंबंधीत काही तक्रार असल्यास त्याबाबतचे रितसर लेखी निवेदन दिनांक ३१/०१/२०२६ पूर्वी कंपनी सचिव, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला यांचे कडे सादर करावे लागेल. निवेदन योग्य असल्याचे आढळून आल्यास त्याप्रमाणे यादी दुरूस्त केली जाईल. उमेदवारांच्या उपयोगासाठी मतदार यादी विक्रीसाठी रू. ५००/- प्रति यादी या किंमतीवर फक्त नोंदणीकृत कार्यालयात उपलब्ध राहील.

**<u>नामांकन पत्र :-</u>**

प्रत्येक कृषक भागधारक, ज्यांना निवडणुकीत मतदानाचा अधिकार आहे ते संबंधीत मतदार संघाच्या निवडणुकीत उमेदवार म्हणून नामांकन पत्र दाखल करु शकतात तथापी उमेदवार म्हणून नामांकन पत्र भरणाऱ्या व्यक्तीकडे महामंडळाची रु. १०००/– पेक्षा जास्त रुपयांची थकबाकी नसावी. तसेच कंपनी कायदा २०१३, कलम १६४ च्या तरतुदीनुसार व इतर तरतुदीनुसार उमेदवार अपात्र नसावा.

नामांकन भरणाऱ्या व्यक्तीकडे सक्रिय **Director Identification Number (DIN)** असणे आवश्यक आहे. नामांकन पत्र महामंडळाच्या अकोला येथील नोंदणीकृत कार्यालयात तथा अकोला, परभणी, नागपूर, जळगांव, पुणे व जालना येथील विभागीय कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील. पूर्णतः भरलेले तथा स्वाक्षरी केलेले नामांकनपत्र उमेदवारांनी स्वतः नोंदणीकृत कार्यालय महाबीज भवन कृषिनगर, अकोला येथे निवडणूक निर्णय अधिकारी अथवा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे अंतिम तारीख ०२/०२/२०२६ च्या दुपारी ३.०० वाजे पर्यंत (सार्वजनिक सुटीचे दिवस वगळून) दाखल करणे आवश्यक आहे. नामांकन पत्र दाखल करण्याआधी पात्र असल्याची खातरजमा स्वतः करुन घ्यावी, अपुर्ण व त्रृटी असलेले नामांकन पत्र स्विकार केले जाणार नाही.

**<u>निवडणुकीसाठी भरावयाची अनामत रक्कम :-</u>**

ज्या भागधारकांना निवडणुकीत उमेदवार म्हणून सहभाग नोंदवायचा असेल त्यांना नामांकन पत्रासोबत रु.१,००,०००/– (रूपये एक लाख फक्त) राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्टद्वारे ‘‘महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित’’, अकोला च्या नावांने भरावे लागतील. अथवा ‘‘महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित’’, च्या खात्यात **NEFT/RTGS** व्दारे जमा करता येईल. काही कारणास्तव नामांकन पत्र नामंजूर झाल्यास ही अनामत रक्कम संबंधितांना लेखी अर्जाद्वारे विनंती केल्यावर परत करण्यात येईल. तथापि, निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारास जर संबंधित मतदार संघाच्या झालेल्या एकूण वैध मतदानाच्या २५ टक्के पेक्षा कमी मते मिळाल्यास अशा उमेदवारांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

**<u>नामांकन पत्राची छानणी :-</u>**

निवडणुक निर्णय अधिकारी हे नोंदणीकृत कार्यालयात अर्थात ‘महाबीज भवन’, कृषि नगर अकोला येथे दिनांक ०२/०२/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता नंतर नामांकन पत्राची छानणी करतील आणि त्यावेळेस उमेदवार अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. तसेच गुरुवार दिनांक ०५/०२/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उमेदवारास निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांकडे समक्ष लेखी निवेदन सादर करून आपली उमेदवारी परत घेता येईल. एकदा उमेदवारी परत घेण्याबद्दल निवेदन सादर केल्यानंतर, असे निवेदन कोणत्याही कारणास्तव परत घेता/दाखल करता येणार नाही.

**<u>मतदान पध्दती :-</u>**

संचालकांच्या निवडणुकीच्या कार्यक्रमाबाबतचे वृत्त मतदारांच्या माहितीसाठी संबंधीत मतदार विभागातील मराठी दैनिकातून व सुचना फलकाद्वारे शुक्रवार दिनांक ०९/०१/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. मतदान हे फक्त टपाल मतपत्रिकेद्वारे होणार असल्याने मतदान तथा मतदानाच्या पध्दतीबाबत विस्तृत माहिती पुढील प्रमाणे–

१. आपणास पोष्टाद्वारे मतपत्रिका व ओळख पत्र पाठविण्यात येईल.
२. दिलेले ओळख पत्र पुर्णपणे स्वतः भरावयाचे आहे आणि आपण जशी महाबीजला नमुना स्वाक्षरी/अंगठा दिलेला आहे, तशिच स्वाक्षरी/सही करावयाची आहे. नाहीतर ओळख पत्र तथा मतदान पत्रिका रद्द होईल.
३. दिलेल्या मतपत्रिकेवर आपल्या पसंतीच्या एक उमेदवाराच्या नावासमोर चौकोनात (✓) अशी खुण करून मतदान करावे, सदर मतपत्रिका कार्यालयाने पाठविलेल्या लिफाफा क्रंमाक २ मध्ये बंद करावी.
४. मतपत्रिका लिफाफा क्रमांक २ आणि ओळख पत्र पूर्ण भरलेले असे हे दोन्ही पत्र कार्यालयाने पाठविलेल्या लिफाफा क्रमांक १ मध्ये बंद करून मुख्य कार्यालयास दि. १३/०३/२०२६ रोजी संध्याकाळी ६.०० वाजता पर्यंत पोहचतील याची भागधारकांनी दक्षता घ्यावी. यानंतर प्राप्त होणारे लिफाफे विचारात घेण्यात येणार नाहीत.

५. भागधारकांनी मुख्य कार्यालयास पाठवावयाचे लिफाफे हे फक्त पोष्टाद्वारेच स्विकारण्यात येतील. व्यक्तिगत आणून दिल्यास महाबीजच्या मुख्य तथा अन्य कुठल्याही कार्यालयास लिफाफे स्विकारल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

६. कार्यालयाने पाठविलेल्या लिफाफ्यास कुठलेच पोष्टाचे तिकीट लावू नये. सदर लिफाफ्याचे पोष्टाचा येणारा खर्च महाबीजने पोष्टामध्ये जमा केलेला आहे.

७. ओळख पत्र आणि टपाल मतपत्रिका हे आपणाकडे पाठविण्यात येतील. ज्यावर सांकेतीक सील लावलेले आहे, हेच अधिकृत फॉर्म म्हणून ग्राह्य धरल्या जातील. त्यामुळे टपाल मतपत्रिकेचा दुरुपयोग होणार नाही तसेच अशा फॉर्मची छायाप्रतही अवैध ठरणार आहे, हयाची नोंद घ्यावी.

८. भागधारकांनी निवडणूकीबाबत अधिक माहितीसाठी निवडणूक अधिसुचनांचे (नोटीस) वाचन करावे.

तसेच महामंडळाकडून पाठविण्यात आलेल्या टपाल मतपत्रिका न मिळाल्यास, गहाळ किंवा हरवल्यास त्याकरीता संबंधीत भागधारकास निवडणूक अधिकारी यांचे कडे रितसर लेखी अर्जासह प्रतिज्ञापत्र/ॲफिडेव्हीट करून, त्यासोबत भागधारकाकडे पुराव्यादाखल काही बाब उपलब्ध असेल तर त्यासह सादर करावे लागेल. त्यासंबंधी निवडणूक अधिकारी यांचे समाधान झाल्यानंतरच ते डुप्लीकेट/ दुसरी मतपत्रिका देतील. जर भागधारकाने दोन्ही टपाल मतपत्रिका सादर केल्यास डुप्लीकेट टपाल मतपत्रिका वैध मानल्या जाईल.

दिनांक १६/०३/२०२६ ते २५/०३/२०२६ या कालावधीत होणाऱ्या ओळख पत्रांची छाननीसाठी तसेच शुक्रवार दिनांक २७/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून होणाऱ्या मतमोजणी करीता, महामंडळाच्या नोंदणीकृत कार्यालयात उमेदवारास समक्ष अथवा प्रतिनिधीमार्फत उपस्थित राहता येईल. मतमोजणी संपल्यानंतर निकाल जाहीर करण्यात येईल.

अशा प्रकारे निवडून आलेल्या संचालकांची नांवे त्यानंतर होणाऱ्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येतील.

## विशेष सुचना

१. महाबीज संचालक मंडळास ग्राहय असलेल्या तरतुदीनुसारच ही निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यात येईल व ही बाब या नोटीफीकेशनद्वारे सर्व इच्छुक उमेदवार/ त्यांचे प्रतिनिधी, भागधारक व त्यांनी नेमलेले प्रतिनिधी यांना याबाबत पूर्ण जाणीव आहे हे गृहीत धरून व मान्य मर्यादेतच ही निवडणूक-अधिसूचना प्रकाशित केल्या जात आहे याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

२. कोणत्याही उमेदवाराने जर महामंडळाची बदनामी होईल वा महामंडळाचे ख्यातीस हानी पोहोचेल, अशा प्रकारचे कोणतेही वर्तन केल्यास त्यांची उमेदवारी रद्द करण्याचे अधिकार निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना राहतील.

३. निवडणुकीसंबंधी कोणताही वाद उद्भवल्यास त्याकरीता फक्त अकोला हेच न्यायालयीन क्षेत्र राहील.

निवडणूक निर्णय अधिकारी
तथा कंपनी सचिव
महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला.